# एक्स्टर्नल सब-ऑफिसर्स पाठयक्रम (निवासी)

| | | |
|---|---|---|
| **जागांची संख्या** | : | प्रत्येक पाठयक्रमासाठी ३० |
| **कालावधी** | : | ६ महिने |
| **उददेश** | : | अग्निशमन सेवेसाठी प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध करुन देणे तसेच अग्निशमन सेवेत कार्यरत कर्मचारी यांना अग्निशमन सेवेचे, नियंत्रणाचे मुलभूत प्रशिक्षण देणे, तसेच जिवित व मालमत्तेचे आगीपासून संरक्षण करण्याचे प्रशिक्षण देणे तसेच अग्निशमन विषयक उपकरणे हाताळणे, त्याची निगा ठेवणे. |
| **शैक्षणिक पात्रता** | : | खाजगी उमेदवारांसाठी किमान १२ वी परिक्षा उत्तीर्ण व<br>पुरस्कत उमेदवारांसाठी किमान एस.एस.सी.(१० वी) परीक्षा उत्तीर्ण |
| **वयोमर्यादा** | : | खाजगी उमेदवाराचे वय १८ ते २३ वर्षे तसेच<br>पुरस्कृत उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.<br><br>अनु.जाती/जमाती मागासवर्गीयांकरीता ५ वर्षे शिथीलक्षम<br>(पाठयक्रम सुरु होण्याच्या दिवशी) |
| **शारिरीक पात्रता**<br>(किमान) | : | उंची - १६५ सें.मी.<br>वजन - ५० कि.ग्रॅ.<br>छाती - सर्वसाधारण ८१ सें.मी.<br>फूगवून ८६ सें.मी. |

सदर पाठयक्रम केंद्र शासनाच्या राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचेतर्फे आयोजित करण्यात येतो. खाजगी उमेदवारांना राष्ट्रीय पातळीवर लेखी परिक्षेच्या माध्यमैंतून मेरीटप्रमाणे निवड करण्यांत येते. अग्निशमन सेवेतील पुरस्कत उमेदवारांच्या शिफारशी अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन व राज्य शासनातर्फे करण्यांत येऊन निवड राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर तर्फे करण्यांत येते. निवड झालेल्या प्राशिक्षणार्थींना विविध रिजनल फायर ट्रेनिंग सेंटर मध्ये प्रशिक्षणासाठी पाठविण्यांत येते.